# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ, औरंगाबाद.

**Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone: 0240-2336172**

**Case No: CGRF/AZ/JLN/139/2008/60/** **Date:-**

**To,**
**The Executive Engineer ( Administration)**
**O/O Superintending Engineer,**
**Circle office , M.S.E.D.C.L.,**
**JALNA**

Sub:- Forwarding of grievance in respect of Shri Ramrao Gopalrao Kulkarni, Marketyard ,State Bank of Hyderabad, At post Mantha , Tq.Mantha,Dist. Jalna (Consumer No. 524030005201)

**Dear Sir**

Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum from Shri Ramrao Gopalrao Kulkarni, Marketyard State Bank of Hyderabad, At post Mantha, Tq Mantha, Dist.Jalna

You are requested to submit your parawise reply on the grievance within 15 days from the date of this letter

**The hearing in this matter is kept on 21/10/2008 at 13=00 Hrs.**

**Member/Secretary**
Consumer Grievance Redressal Forum,
MSEDCL (AZ) Aurangabad.

**Encl As above**.

Copy to :
**Shri Ramrao Gopalrao Kulkarni,**
**Marketyard ,State Bank of Hyderabad,**
**At post Mantha , Tq.Mantha,**
**Dist. Jalna**

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/१३९/२००८/६०**

**तक्रार दाखल दिनांक ;- ०७/१०/२००८**
**निकाल दिनांक ;- ०६/११/२००८**

**श्री रामराव गोपाळराव कुलकर्णी,**
**मार्केट यार्ड परिसर स्टेट बॅक ऑफ हैद्राबाद जवळ**
**मु.पो. मंठा ता. मंठा जिल्हा जालना**
**(ग्राहक क्र.५२४०३०००५२०१) अर्जदार/ग्राहक**

**विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित (शहर मंडळ,) औरंगाबाद. गैरअर्जदार**

## आदेश

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक ०७/१०/२००८ रोजी जालना शहर मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी, जालना यांना पाठविण्यात आली व या बाबतीत त्यांचे म्हणणे १५ दिवसाच्या आत दाखल करण्याचे सांगण्यात आले. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक २१/१०/२००८ रोजी ठेवण्यात आली.

ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) अर्जदार यांनी महावितरण वीज कंपनीकडुन घरगुती वापरासाठी वीज पुरवठा घेतला आहे. त्यांना एप्रिल २००८ मध्ये रूपये ५७००/- चे वीज बिल देण्यात आले ज्याचा भरणा दिनांक २६/०५/२००८ रोजी त्यांनी केलेला आहे.महावितरण कंपनीतर्फे मे २००८ या महीन्याचे ५३७३.५५रूपये बिल त्यांना देण्यात आले ज्यात मागील थकबाकी दर्शवित त्यावर व्याज व दंड आकारण्यात आल्याचे अर्जदाराचे म्हणणे आहे. त्यांनी याबाबत केलेल्या तक्रारीची दखल महावितरणच्या संबंधीत विभागाने न घेतल्यामुळे त्यांनी मंचात ही तक्रार दाखल केली असुन त्यांना देण्यात आलेल्या चुकीच्या वीज बिल रद्द करण्याबाबत तसेच नुकसान भरपाई देण्याबाबत आदेश देण्याची विनंती त्यांनी मंचास केली आहे.

२) दिनांक ०७/१०/२००८ रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अर्जदार श्री रामराव गोपाळराव कुलकर्णी तसेच महावितरणचे नोडल अधिकारी यांचे अधिकृत प्रतिनिधी श्री गौड उपस्थित होते. त्यांनी अर्जदाराच्या तक्रारीवर आपला जवाब मंचात दाखल केला, त्यांनी दाखल केलेल्या जवाबानुसार अर्जदाराने दिनांक २६/०५/२००८ रोजी भरलेली रक्कम नजरचुकीने कमी दाखविण्यात आल्यामुळे मे २००८ च्या वीज बिलात थकबाकी दाखविण्यात आली व त्यावर व्याज आकारण्यात आले,सप्टेबर २००८ च्या वीज बिलात दुरूस्ती करून अर्जदारास सुधारीत वीज बिल देण्यात आल्याचे त्यांना आपल्या जवाबात पुढे म्हटले आहे.

३) महावितरण कंपनीने अर्जदारास दाखल केलेल्या सुधारीत बिलाची प्रत देण्यात आली व अर्जदाराने बिल योग्य असल्याचे सांगीतल्यामुळे प्रकरण निकालासाठी राखुन ठेवण्यात आले.

४) दोन्ही बाजुकडुन मंचात दाखल झालेल्या कागदपत्रावरून असे आढळुन येते की, महावितरण कंपनीकडुन अर्जदारास एप्रिल २००८ या काळाचे ५७००/-

रूपयाचे बिल देण्यात आले ज्याचा भरणा त्यांनी दिनांक २६/०५/२००८ रोजी केलेला दिसुन येतो. महावितरण कंपनीच्या संबंधीत विभागाने अर्जदाराने भरलेल्या रक्कमेची नोंद रूपये ५७००/-ऐवजी रूपये ५७०/- अशी केल्यामुळे मे २००८ च्या वीज बिलात अर्जदारास थकबाकी व त्यावरील व्याज असे वीज बिल देण्यात आले. नोडल अधिकारी यांनी ही चुक मान्य करून सप्टेबर २००८ या महिन्यात अर्जदारास सुधारीत वीज बिल दिले असुन ते योग्य असल्याचे मंचाचे मत आहे.

५) अर्जदाराने त्याला एप्रिल २००८ मध्ये देण्यात आलेल्या चुकीच्या बिलाची तक्रार दिनांक २४/०६/२००८ ते २८/०७/२००८ तसेच २२/०९/२००८ रोजी महावितरणच्या संबंधीत विभागाने पण त्यांची कोणतीच दखल घेतली गेल्याचे दिसुन येत नाही. अर्जदाराने या मंचात दाखल केल्यानंतरच चुक मान्य करीत महावितरण कंपनीने अर्जदाराचे वीज बिल दुरूस्त करून दिले असल्याचे आढळुन येते.अर्जदार हे त्यांना झालेल्या आर्थीक तसेच मानसीक त्रासापोटी नुकसान भरपाई मिळण्यास पात्र आहेत.

# आदेश

१) महावितरण कंपनी तर्फे अर्जदारास देण्यात आलेले सुधारीत वीज बिल योग्य असुन ते १० दिवसाच्या आत अर्जदारास द्यावे.

२) महावितरण कंपनीने अर्जदारास आर्थीक व मानसीक नुकसानपोटी रूपये २५०/- तीस दिवसाच्या आत द्यावे.

वरील आदेशाचे ग्राहक व महावितरण कंपनी यांनी पालन करावे व त्याबाबत मंचास कळवावे.

गा-हाणे निकाली काढण्यात आले असुन हे ग्राहकास व वितरण कंपनीस कळवावे.

| | | |
|---|---|---|
| **हेमंत अ. कापडिया** | **आ. नि. सोनवणे** | **विष्णु अं. हंबिरे** |
| **सदस्य** | **सदस्य/सचिव** | **अध्यक्ष** |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

**क्र.सीजीआरएफ/एझेड/१३९/२००८/६०** **दिनांक ;-**

**प्रति,**
**श्री रामराव गोपाळराव कुलकर्णी,**
**मार्केट यार्ड परिसर स्टेट बॅक ऑफ हैद्राबाद जवळ**
**मु.पो. मंठा ता. मंठा जिल्हा जालना**
**(ग्राहक क्र.५२४०३०००५२०१)**

( तक्रार क्र.सिजीआरएफ/एझेड/१३९/२००८/६० )

आपण दिनांक ०७/१०/२००८ रोजी दाखल केलेल्या तक्रारीवरील या मंचाचा आदेश सोबत जोडला आहे. हा आदेश मान्य नसल्यास आपण विद्युत लोकपाल यांच्याकडे ६० दिवसाच्या आंत अपिल दाखल करू शकता.

**प्रत,कार्यकारी अभियंता (प्रशासन),**
**अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,**
**म.रा.वि.वि.कं.म. शहर मंडळ,जालना.**

**विद्युतलोकपालाचा पत्ता,**
**विद्युत लोकपाल,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,**
**६०६-६०८, केशवा,**
**बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.**
**दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.**

**सदस्य/सचिव**
**ग्राहक गा-हाणे निवारण मंच**
**म.रा.वि.वि.कं.म.औरंगाबाद.**